Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./ Nc 1 5 5 5 / दि. 15 OCT 2026

परिपत्रक

प्रति,

मा.प्राचार्य / संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :-'ग्लोबल फ्लॉवर फेस्टिवल २०२६' ला विद्यार्थ्यांच्या भेटीबाबत...

संदर्भ :- सकाळ माध्यम समुह ग्रुप चे दिनांक २३ सप्टेंबर, २०२६ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण व्हावी आणि त्यांना या दुर्मीळ वनस्पती व तंत्रज्ञानाचा थेट प्रात्यक्षिक अनुभव मिळावा, याकरिता महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी व शिक्षकांनी सदर महोत्सवाला भेट देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी ही विनंती. सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत:- वरीलप्रमाणे

Sakāl Media Group

Print | Television | Digital | Events

दिनांक: २३ सप्टेंबर २०२६

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T
Inward No. 8342
Date 12/10/26

Date 09/10/2026
Inward No. 739
To Whom AGB. T

प्रति,
डॉ. आर. के. कामत,
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय: 'ग्लोबल फ्लॉवर फेस्टीवल २०२६'ला विद्यार्थ्यांच्या भेटीबाबत...

सस्नेह नमस्कार.

'सकाळ माध्यम समूह' व 'ग्रीन आर्मी, कोल्हापूर'च्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर येथे **'ग्लोबल फ्लॉवर फेस्टीवल २०२६'** आयोजीत करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

या महोत्सवामध्ये देश-परदेशातील विविध प्रजातींची फुले, दुर्मीळ वनस्पती, आधुनिक बागकाम तंत्रज्ञान आणि पुष्पसौंदर्यकलेचे अनोखे प्रदर्शन भरवले जाणार आहे. हा उपक्रम स्थानिक शेतकरी, फलसंवर्धक (Horticulturists) आणि पर्यटन क्षेत्रासोबतच महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी शैक्षणिक अभ्यासाच्या, वनस्पतीशास्त्राच्या व पर्यावरण जागरूकतेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरणार आहे.

महोत्सवाविषयीचे तपशील खालीलप्रमाणे:

ठिकाण : पोलीस उद्यान, पोलीस ट्रॅफीक गार्डन व पोलीस परेड ग्राऊंड, कसबा बावडा, कोल्हापूर
कालावधी : ११ ते २० ऑक्टोबर २०२६
वेळ : सकाळी ०७.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण व्हावी आणि त्यांना या दुर्मीळ वनस्पती व तंत्रज्ञानाचा थेट प्रात्यक्षिक अनुभव मिळावा, या दृष्टीने कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यामधील शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी व शिक्षकांना या महोत्सवाला भेट देण्यासाठी प्रोत्साहित करावे, ही विनंती.

महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांची एकत्रित आगाऊ नोंदणी दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत केल्यास नियमित रू. १००/- चे तिकीट सवलतीच्या दरात रू. ७५/- मध्ये दिले जाईल.

अधिक माहितीसाठी संपर्क - अवधूत गायकवाड 9975131270

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 08/10/2026
Inward No.: 739
To Whom: R

कळावे,

N.V. Pandit

निखिल पंडितराव,
संपादक - कोल्हापूर युनीट

YOUNG INSPIRATORS NETWORK KOLHAPUR